महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकिर्ण १६१७/प्र. क्र.३१ /व्यय-३
वित्त विभाग, ५ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ :-१) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२००४/प्र.क्र. १५/०४/१२, दिनांक २५/०५/२००६.
२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओडी-१००७/प्र.क्र. ९/१८ (र.व का.), दिनांक १४/११/२०१३
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकिर्ण-२०१२/प्र.क्र. ५४/(र.व का.) दिनांक ११/०८/२०१४

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा राज्यात दिनांक ०१/०७/२००६ पासून अंमलात आलेला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ९(२) नुसार "प्रत्येक कार्यालयचा किंवा विभागाचा प्रमुख, त्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधीत सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या सादर करण्यासाठी शक्यतो अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करील" अशी तरतूद आहे.

त्या अनुषंगाने या कार्यासनाशी संबंधित विषयाच्या बाबतीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्यात येत आहेत. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास दि. ११.०८.२०१४ च्या परिपत्रकात नमुद केल्यानुसार सादरीकरणाचे तीनपेक्षा अधिक स्तर असतील.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०२२२१७४२१९१६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Yashvant
Murlidhar
Budhvant

Digitally signed by Yashvant Murlidhar Budhvant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=Finance Department, postalCode=400032,
st=Maharashtra,
2.5.4.20=cd43ae656ca49a2302a62b3b60e2da84795a
64334d534cbff343e1ef6248b621,
serialNumber=bed6d09714e8199fa23dc6091a07c3a
7117759cb35945a8b7e3fbbb718b50b50,
cn=Yashvant Murlidhar Budhvant
Date: 2018.02.22 17:43:15 +05'30'

(यशवंत बुधवंत)
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव (वि.सु.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (व्यय) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५) उप सचिव,प्रशासन-२ /व्यय-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अवर सचिव, प्रशासन-२ / व्यय-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) निवड नस्ती-व्यय-३.

<u>वित्त विभाग/ व्यय-३</u>

कार्यालयीन आदेश क्र.संकीर्ण १६१७/प्र.क्र.३१/व्यय-३, दि. २२.०२.२०१८ सोबतचे विवरणपत्र

शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ९ (२) नुसार कार्यासनाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करण्याबाबत अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करणे

अ.क्र.	कार्यासनाकडून हाताळले जाणारे कामकाज	सादरीकरणाचे ३ स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी	आदेश निर्गमित करण्यास सक्षम प्राधिकारी
		प्रथम	द्वितीय	तृतीय		
१	गृहनिर्माण विभाग, नगर विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग या विभागांशी संबंधित व्यय विषयक बाबी	कक्ष अधिकारी / अवर सचिव	उप/सह सचिव	अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव	अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव	--
२	कार्यासनाशी संबंधित विभाग/ विषयाबाबतचे न्यायालयीन कामकाज	कक्ष अधिकारी / अवर सचिव	उप/सह सचिव	अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव	अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव	--

....